# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/03/2024 (शनिवार) सकाळ


### उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर यांची सावनेर उपविभागातील सट्टापट्टी लिहणारे अवैध धंदेवाईकांवर धाडसत्र मोहीम

श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात त्यांचे पथकाने दि. ०८/३/२०२४ रोजी अवैध धंदेवाईकांवर धाडस मोहीम राबविली. पोलीस स्टेशन खापा हद्दीमध्ये लोकांकडुन पैसे घेवुन वरली मटक्याचे सट्टीपट्टीचे आकडे लिहुन जुगार खेळ खेळविणारे **१) पतीराम कृष्णाजी बारापात्रे २) मनोज शिवराम बावणे ३) संजय शिवराम बावणे ४) शांताराम शिवाजी पवार ५) जागेश्वर रमेश ठोसरे सर्व रा. खापा** कारवाई केली असुन त्यांचेकडुन सट्टापट्टीचे साहीत्य, वेगवेगळे मोबाईल व नगदी असा एकुण ११८१५/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पोलीस स्टेशन खापा येथे आरोपींविरूध्द गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक मिलींद गेडाम, पोलीस हवालदार नरेश गाते, अनिल मुंढे, पोलीस अंमलदार नितेश पुसाम, यांनी केलेली आहे.

### उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर यांची सावनेर उपविभागातील हुक्का पार्लर चालविणारे अवैध धंदेवाईकांवर धाडसत्र मोहीम

पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी परिसरातील हॉटेल ॲटमॉस फिअर दी हायवे ॲग आउट येथे अवैध हुक्का पार्लर सुरू असल्याची गोपनिय माहीती मिळाल्यावरून दि. ०९/०३/२०२४ चे पहाटे दरम्यान सदर ठिकाणी धाड टाकली असता तेथे काही ईसम हुक्का मिळुन आल्याने सदर ठिकाणाहुन हुक्का पार्लरचे साहित्य एकुण किंमती ६७,६७०/– रू. चा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे– १) संघदीप मोरेश्वर मेश्राम रा. गिट्टीखदान नागपुर २) अजय शामराव गजभिये रा. ८ वा. मैल मंडपे ले आउट नागपुर ३) दिपक राजेन्द्र उरकुडे रा. खैरी पन्नासे ता. हिंगणा ४) असलम उर्फ राजा अशफाक खान रा. बोरगाव दिनशा फॅक्ट्री ५) डॅनिस वारेन रा. मानकापुर** यांचेविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ४ (अ), २१ (अ) कोपा ॲक्ट सहकलम १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात पोउपनि दत्तात्राय कोलटे, विवेक गाडगे यांनी केलेली आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर